दावा दाखल दिनांक	:	०४/०३/२०२२
दावा नोंदणी दिनांक	:	०४/०३/२०२२
निकाल दिनांक	:	२३/११/२०२३
दावा कालावधी	:	दि./म./वर्षे
	:	१९/०८/०१

मे. न्यायाधीश सहकारी न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.

(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)

दावा क्रमांक ५१/२०२२

वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्या.,
शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर
शाखा- अंबर प्लाझा, गाळा नं.५६/५७,
पहिला मजला, स्टेशन रोड, अहमदनगर
(श्री. अरुण रावसाहेब इंगळे यांचे मार्फत.) **---- वादी**

विरुध्द

१) श्री. प्रविण दिलीप खांदवे
रा. घर नं. ३९, मोहीनी नगर, दत्त मंदिराजवळ,
केडगांव देवी, अहमदनगर.

२) श्री. सुदेश श्रीधर दुगम
म.रा.वि.वि.कं.लि.ई.एच.व्ही.४०० केव्ही.,
निर्मळ पिंपरी,मु. पो. बाभळेश्वर,
ता. राहाता, जि. अहमदनगर.

३) श्री. विजय नवनाथ थोरे
म.रा.वि.वि.कं.लि.ई.एच.व्ही.४०० केव्ही.,
निर्मळ पिंपरी,मु. पो. बाभळेश्वर,
ता. राहाता, जि. अहमदनगर.

४) पिराजी गंगाधर धनवटे (मयत)
वारस श्रीमती आशा पिराजी धनवटे
मु.पो. बाभळेश्वर, ता.राहाता, जि. अहमदनगर.

---- प्रतिवादी

<u>**दावा वसुलीकरीता रक्कम रुपये ३,६१,८४९/-**</u>

वादीतर्फे वकील श्री.बी.आर.कवडे
प्रतिवादी क्र.१ करिता वकील श्री.एम.बी.आंबेकर
प्रतिवादी क्र.२ ते ४ गैरहजर, एकतर्फा.

नि का ल प त्र
(पारीत दि.२३/११/२०२३)

१) वादी संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी झाली असुन, प्रतिवादी हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र.१ यांनी संस्थेकडे कर्ज मागणी अर्ज केला होता आणि संस्थेने दि.२२/१२/२०१६ च्या सभेतील ठराव क्र.५ अन्वये कर्ज मंजूरी करण्यात आली व प्रतिवादी क्र.१ यांना रु.७,००,०००/-चे कर्ज मंजुर करुन रक्कम अदा केली. सदर कर्जाकरिता प्रतिवादी क्र.२ ते ४ हे जामिनदार आहेत.

२) प्रतिवादींनी वादीच्या हक्कात कर्ज मागणी अर्ज, कर्ज रोखा, वचन चिठ्ठी रु.७,००,०००/- इ. कागदपत्रे करुन दिलीत. प्रतिवादींनी कर्जाची रक्कम द.सा.द.शे. १२% व्याजासह देण्याचे कबुल केले. सदर कर्जाची परतफेड **१४० मासिक हप्त्यात** करायची होती. प्रतिवादीने २% दंडव्याज देण्याचे सुध्दा कबुल केले होते. प्रतिवादी क्र.१ यांच्याकडील कर्जाची दि.३०/०६/२०१९ रोजी थकबाकी झाली. प्रतिवादी क्र.१ यांनी कर्ज रक्कम उचल केल्यानंतर त्यांनी कर्ज खात्यात वेळोवेळी रक्कम भरणा केली. परंतु प्रतिवादी क्र.१ यांनी कबुल केल्याप्रमाणे कर्ज फेडीचे हप्ते भरले नाहीत.

३) वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ च्या नावाचा खाते उतारा ठेवला असुन त्यामध्ये कर्ज रक्कम नावे टाकली आहे. प्रतिवादी क्र.१ कडे दि.३१/१२/२०२१ अखेर रु.३,५९,८४९/- येणे बाकी आहे. वादी संस्थेने प्रतिवादींना दि.२१/११/२०२१ रोजी नोटीस देऊन दाव्यातील कर्ज रक्कमेचे मागणी केली. परंतु प्रतिवादींनी रक्कमेची परतफेड केली नाही. वादीने एकुण रक्कम रु.३,५९,८४९/- मुद्दल येणे बाकी आणि रु.२,०००/- नोटीस फी एकुण रु.३,६१,८४९/- ची मागणी केली आहे करिता संस्थेला सदरचा दावा दाखल करणे भाग पडले.

४) प्रतिवादींना न्यायालयामार्फत पाठविलेल्या समन्सची बजावणी झाली. प्रतिवादी क्र.१ हजर होऊन त्यांनी निशाणी-१४ कडे कैफियत दाखल केली. प्रतिवादी क्र.१ यांचे कथन आहे की, दावा दाखल करण्याचा अधिकार शाखाधिकारी श्री.अरुण इंगळे यांना नाही आणि दावा दाखल करण्याबाबतचा कोणताही ठराव झाला नाही. तसेच वादीचा दावा मुदतीत नाही आणि या कारणास्तव दावा रद्द होण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी वादीचे इतर कथन अमान्य केले. प्रतिवादी क्र.१ यांनी कथन केले आहे की, ते महाराष्ट्र राज्य वीद्युत वितरणचे कर्मचारी आहेत. त्यांनी वादी संस्थेकडे कर्ज मागणी करुन रु.७,००,०००/- कर्ज घेतले. प्रतिवादी क्र.१ यांनी संस्थेचे मार्च-२०१९ मध्ये संपूर्ण रक्कम भरणा करुन कर्ज खाते निल केले आहे आणि त्यानंतर सन २०१९ मध्ये वादी संस्थेच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला आहे. प्रतिवादी क्र.१ कडे वादी संस्थेची कोणतीही रक्कम बाकी नाही. संस्थेने कर्ज खात्याचा खोटा खाते उतारा दाव्यासोबत जोडला आहे. सदरचा खाते उतारा बनावट असुन कर्ज खाते उताऱ्याच्या आधारे संस्थेस रक्कम मागण्याचा अधिकार नाही.

५) प्रतिवादी क्र.१ यांनी संस्थेची कर्ज रक्कम परतफेड केली असतांनाही बेकायदेशीरपणे त्यांच्या पगारातुन कर्ज रक्कमेची वसुली चालू केली. प्रतिवादी क्र.१ यांच्या मासिक पगारातुन संस्थेने रक्कम कपात करु नये याबाबत वेळोवेळी अर्ज दिले. तसेच ॲड.बनकर यांच्या मार्फत सन २०२१ मध्ये नोटीसा दिल्या. पतसंस्थेच्या अधिकाऱ्यांनी बेकायदेशीरपणे महापारेषण कार्यालय, औरंगाबाद यांना पगार कपातीबाबत पत्र देऊन परस्पर पगार कपात करुन आजपावेतो रक्कम रु.४०,०००/- पगार कपात केली. संस्थेने बेकायदेशीरपणे प्रतिवादी क्र.१ यांनी रक्कम भरणा केली असतांना पगारातुन कपात केली आहे. वादी संस्थेने दाखल केलेला दावा खोटा व विनाकारण आहे त्यामुळे प्रतिवादीस संस्थेकडून कॉम्पेन्सेटरी कॉस्ट म्हणून रु.२५,०००/- देण्याबाबतची विनंती केली. तसेच त्यांच्या पगारातुन कपात झालेली रक्कम रु.४०,०००/- त्यांना परत देण्याची सुध्दा विनंती केली.

प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना दाव्यातील समन्स मिळूनसुध्दा ते हजर न झाल्यामुळे त्यांच्या विरुध्द एकतर्फी आदेश पारित करण्यात आला.

६) वादी आणि प्रतिवादी क्र.१ च्या कथनावरुन निशाणी-२६ कडे मुद्दे काढण्यात आले आणि माझा निष्कर्ष कारणमिमांसासह खालील प्रमाणे आहे.

मुद्दे	निष्कर्ष
१) प्रतिवादी व्यक्तिगत व सामुदायीकरित्या रक्कम रु.३,६१,८४९/- द.सा.द.शे. १४% दराने व्याज व २% दराने दंडव्याजासह दि.०१/०१/२०२२ पासून ते पुर्ण रक्कम फिटेपर्यंत परतफेड करण्यास जबाबदार असल्याचे वादी सिध्द करु शकते काय?	--- अंशतः होकारार्थी
२) वादीचा दावा मुदतबाह्य आहे काय?	--- नकारार्थी
३) प्रतिवादी क्र.१ यांनी वादी संस्थेस मार्च-२०१९ मध्ये कर्जाचा संपुर्ण रक्कमेचा भरणा केल्याचे प्रतिवादी क्र.१ सिध्द करु शकते काय?	--- नकारार्थी
४) प्रतिवादी क्र.१ त्यांच्या पगारातून कपात झालेली रक्कम रु.४०,०००/- वादी संस्थेकडून वसुल करण्यास हक्कदार आहे काय?	--- नकारार्थी
५) आदेश व हुकूमनामा काय?	--- अंतिम आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

७) **मुद्दा क्र. १, ३ व ४ करिता :-** वादीच्या कथनानुसार संस्थेने प्रतिवादी क्र.१ यांना रु.७,००,०००/- कर्ज दिले आणि त्याकरिता प्रतिवादी क्र.२ ते ४ जामिनदार आहेत. परंतु करारनामाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी कर्जाची परतफेड केली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या कैफियतमध्ये कर्ज घेतल्याचे मान्य केले असुन त्याकरिता प्रतिवादी क्र.२ ते ४ जामिनदार असल्याचेसुध्दा मान्य केले. प्रतिवादीने कर्ज घेतल्याचे मान्य केल्यामुळे मुद्दा उपस्थित होतो की, वादीने मागणी केलेल्या दाव्यातील रक्कमेकरिता प्रतिवादी जबाबदार आहेत किंवा नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या कैफियतमध्ये निवेदन केले आहे की, त्यांनी मार्च-२०१९ मध्ये कर्जाची पूर्ण रक्कम भरली.

८) वादीने दाव्यातील कथन सिध्द करण्याकरिता निशाणी-२८ कडे संस्थेचे अधिकृत साक्षीदार म्हणून श्री.अरुण रावसाहेब इंगळे यांचे शपथ पत्र दाखल केले आणि त्यांच्या शपथपत्रानुसार

त्यांना संस्थेने दाव्यात पुरावा देण्याचा अधिकर दिला आणि त्याकरिता निशाणी-३० कडे दि.१९/०१/२०२२ च्या संचालक मंडळ सभेतील ठराव क्र.१४ (१) ची प्रत दाखल केली. त्यावरुन दिसुन येते की, वादी साक्षीदाराला सदर प्रकरणात साक्ष देण्याचे अधिकार दिलेले आहेत. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या कैफियतमध्ये निवेदन केले आहे की, श्री.अरुण इंगळे यांना कोणताही अधिकार ठरावाद्वारे दिला नाही. परंतु प्रतिवादी क्र.१ च्या कथनात तथ्यता दिसुन येत नाही. कारण वर नमुद निशाणी-३ ठरावामध्ये स्पष्टपणे नमुद आहे की, संस्थेच्या वतीने श्री.अरुण इंगळे यांना साक्ष देणेशिवाय इतर अधिकार दिल्याचे नमुद आहे. वादी साक्षीदाराच्या तोंडी पुराव्याशिवाय निशाणी-३१ कर्ज मागणी अर्ज, निशाणी-३२ कर्ज रोखा, निशाणी-३३ वचन चिठ्ठी, निशाणी-३४ हमीपत्र, निशाणी-३६ खाते उतारा, निशाणी-३५ पगार स्लिप, तसेच निशाणी-४३ कडे परत खाते उतारा आणि निशाणी-४४ कडे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे दाखल केली. प्रतिवादी क्र.१ चे वकील श्री.आंबेकर यांनी वादी साक्षीदाराची उलटतपासणी घेतली. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे शपथपत्र निशाणी-४९ कडे दाखल केले. तसेच निशाणी-४६ कडे त्यांनी वादी संस्थेचा खाते उतारा दाखल केला. वादीचे वकील श्री.कवडे यांनी प्रतिवादी क्र.१ ची उलटतपासणी घेतली.

९) वादी संस्थेच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांना कर्ज रक्कम रु.७,००,०००/- दिले प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या कैफियतमध्येसुध्दा ही बाब मान्य केली. तसेच निशाणी-३१ ते ३४ कर्ज कागदपत्रेसुध्दा दर्शवितात की, प्रतिवादी क्र.१ यांनी वादी संस्थेकडून कर्ज रक्कम रु.७,००,०००/- घेतले आणि त्याकरिता प्रतिवादी क्र.२ ते ४ हे जामिनदार आहेत. परंतु प्रतिवादी क्र.१ यांनी मुद्दा उपस्थित केला की, त्यांनी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड मार्च-२०१९ मध्ये केली आणि कर्ज खाते निल केले आणि त्यानंतर सन २०१९ मध्ये त्यांनी सभासदत्वाचा राजीनामा दिला. त्यांच्याकडे संस्थेची कोणतीही कर्ज रक्कम येणे बाकी नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी संस्थेची संपुर्ण कर्जाची रक्कम परतफेड केली किंवा नाही याकरिता वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेले कागदपत्रीपुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

१०) वादी संस्थेच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांना कर्ज रक्कम रु.७,००,०००/- दिल्यानंतर त्यांनी वेळोवेळी कर्ज खात्यामध्ये काही कर्ज रक्कमा भरल्या. परंतु शर्ती व अटीप्रमाणे कर्ज

हप्ते भरले नाही. त्यामुळे त्यांच्याकडे रु.३,५९,८४९/- दि.३१/१२/२०२१ अखेर बाकी आहेत. परंतु प्रतिवादी क्र.१ यांनी ही बाब नाकारुन कथन केले आहे की, मार्च-२०१९ मध्ये त्यांनी कर्जाची संपुर्ण रक्कम भरली. प्रतिवादी क्र.१ कडे दाव्यातील नमुद रक्कम बाकी आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी वादी संस्थेवर आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी मार्च-२०१९ मध्ये कर्जाची परतफेड पुर्णपणे केली हे दाखविण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र.१ वर आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी कैफियतमध्ये मार्च-२०१९ मध्ये कर्जाची पुर्ण परतफेड केल्याचे नमुद केले. परंतु प्रतिवादी क्र.१ चे वकील श्री.आंबेकर यांनी युक्तिवाद केला की, मार्च-२०१९ नसुन मे-२०१९ मध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी कर्जाची परतफेड केली.

११) वादीचे वकील श्री.कवडे यांनी युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र.१ च्या कैफियतमध्ये मार्च-२०१९ मध्ये कर्ज निल केले असे नमुद नाही. तसेच निशाणी-४६ खाते उतारा हा संस्थेने सर्टिफाईर करुन दिलेला नाही आणि निशाणी-४६ खाते उताऱ्याप्रमाणे दि.३१/०३/२०१९ अखेर प्रतिवादी क्र.१ कडे रक्कम बाकी आहे. पुढे युक्तिवाद केला की, निशाणी-४६ खाते उताऱ्यामध्ये व्याजाच्या नोंदी सॉप्टवेअरमुळे दाखविल्या नाहीत आणि त्याबाबत संस्थेने सदरच्या कंपनीला ३ पत्र दिले. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या सभासदाचा राजीनामा दिल्याबाबतचा कोणताही पुरावा दाखल केला नाही. याउलट प्रतिवादी क्र.१ चे वकील श्री.आंबेकर यांनी युक्तिवाद केला आहे की,. वादीने दाखल केलेला खाते उतारा निशाणी-३६ आणि ४३ खोटा आहे, वादीने दाव्यात कोठेही नमुद केले नाही की, सॉप्टवेअर खराब आहे. तसेच निशाणी-४३ मध्ये सॉप्टवेअरचा कोठेही उल्लेख नाही आणि निशाणी-४४ मध्येसुध्दा तसा उल्लेख नाही. श्री.आंबेकर यांनी पुढे युक्तिवाद केला की, वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ ची संस्थेकडे असलेली शेअर्स रक्कम जमा केली असतीतर कर्ज निल झाले असते. निशाणी-४३ खाते उताऱ्यामध्ये मार्च-२०१९ अखेर रु. ५ लाख काही रक्कम बाकी दाखवली. तसेच निशाणी-४६ मध्ये दि.३१/३/२०१९ अखेर रु.४ लाख काही रक्कम बाकी दाखवली.

१२) वादी आणि प्रतिवादी यांच्या वकीलांनी केलेल्या युक्तिवादातील तथ्य तपासण्याकरिता दाव्यातील उपलब्ध कागदपत्री पुराव्याचे निरिक्षण करणे आवश्यक आहे. निशाणी-३६ खाते उताऱ्याप्रमाणे मार्च-२०१९ अखेर प्रतिवादी कडे रु.५,२८,०४७/- आणि मे-२०१९ अखेर रक्कम रु.२,६४,१४४/- बाकी दाखवली. सदरचा खाते उतारा दि.०३/०१/२०१७ पासुन ते डिसेंबर-२०२१

पर्यंतचा असुन दाव्यातील कथनाप्रमाणे दि.३१/१२/२०२१ अखेर रक्कम रु.३,५९,८४९/- बाकी असल्याचे हा खाते उतारा दर्शवितो. याशिवाय वादी संस्थेने साक्षीदाराच्या पुराव्याच्या शपथपत्रासोबत निशाणी-४३ कडे खाते उतारा आणि निशाणी-४४ कडे खाते उताऱ्यातील नोंदी बरोबर असल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल केले. या खाते उताऱ्यामध्येसुध्दा मे-२०१९ अखेर रु.२,६४,१४४/- बाकी दाखवली. तसेच डिसेंबर-२०२१ अखेर दाव्यातील मागणी रक्कम दाखवली. वादी संस्थेने निशाणी-३ सोबत निशाणी-३६ खाते उतारा दाखल केला असतांना परत निशाणी-४३ खाते उतारा दाखल का करण्यात आला याचे स्पष्टीकरण दिले नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी दोन्ही खाते उतारे खोटे असल्याचे नमुद केले आणि प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी-४६ कडे वादी संस्थेने दिलेला खाते उतारा दाखल केला. सदरचा खाते उतारा दि.०३/०१/२०१७ पासुन ते ०७/०६/२०१९ पर्यंतचा असुन या खाते उताऱ्याप्रमाणे मे-२०१९ अखेर प्रतिवादी क्र.१ कडे रु.१,९६,०००/- बाकी दाखवले. प्रतिवादी क्र.१ कडे रु.१,९६,०००/- बाकी असल्यामुळे आणि वादी संस्थेत त्यांची शेअर्स रक्कम रु.२ लाख जमा असल्यामुळे ही रक्कम बाकी कर्ज रक्कम रु.१,९६,०००/- मध्ये वर्ग केली तर कर्ज निल झाले असते या प्रतिवादी क्र.१ च्या कथनामध्ये तथ्यता दिसुन येते. परंतु त्याकरिता प्रतिवादी क्र.१ यांनी वादी संस्थेकडे सभासदत्वाचा राजीनामा देणे आवश्यक होते. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी संस्थेकडे मे-२०१९ मध्ये राजीनामा दिल्याचे कथन केले. परंतु तो राजीनामा कोणत्या तारखेला संस्थेकडे सादर केला, राजीनामा वादी संस्थेने संचालकमंडळाच्या कोणत्या सभेमध्ये मंजूर केला, राजीहामा मंजूर झाल्याचे प्रतिवादीला कळविले किंवा नाही याबाबत सर्व कागदपत्रे प्रतिवादी क्र.१ यांनी दाव्यात दाखल केली नाहीत. प्रतिवादी क्र.१ चे वकील श्री.आंबेकर यांनी वादी साक्षीदाराच्या उलटतपासणीमध्ये ही बाब रेकॉर्डवर आणली नाही की, प्रतिवादी क्र.१ यांनी मार्च-२०१९ किंवा मे-२०१९ मध्ये कर्जाची पुर्ण रक्कम भरल्यानंतर त्यांनी सभासदत्वाचा राजीनामा दिला आणि तो संस्थेने स्विकारला. याबाबत कोणताही प्रश्न उलटतपासणीमध्ये साक्षीदारास विचारण्यात आला नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी मार्च-२०१९ मध्ये कर्जाचा पुर्ण भरणा केला हे प्रतिवादी क्र.१ चे वकील श्री.आंबेकर यांनी उलटतपासणीमध्ये सिध्द करण्याचा प्रयत्न केला परंतु वादी साक्षीदाराने ते नाकारले. उलट वादी साक्षीदाराच्या उलटतपासणीमधून हे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ ची शेअर्सची रक्कम रु.२ लाख संस्थेकडे जमा आहे. म्हणजेच प्रतिवादी क्र.१ यांचा सभासदत्वाचा राजीनामा प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे संस्थेकडे दिला असता तर संस्थेने तो स्विकारुन रु.२ लाख प्रतिवादी क्र.१ च्या शेअर्सची रक्कम कर्ज खात्यामध्ये वर्ग

केली असती आणि प्रतिवादी क्र.१ चे कर्ज निल झाले असते. परंतु सभासदत्वाचा राजीनामा स्विकारल्याशिवाय प्रतिवादी क्र.१ ची शेअर्सची रक्कम त्यांच्या कर्ज खात्यामध्ये वर्ग करण्याचा संस्थेला अधिकार नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये मान्य केले आहे की, त्यांनी संस्थेकडे त्यांचा राजीनामा मंजूर झाला किंवा नाही याची चौकशी केली होती आणि राजीनामा मंजूर झाल्याचे त्यांना कर्मचारी श्री.राजू बन्सवार यांनी सांगितले. परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणे यासंबंधीची कोणतीही कागदपत्रे रेकॉर्डवर दाखल केली नाहीत.

१३) प्रतिवादी क्र.१ च्या तोंडी पुराव्याप्रमाणे निशाणी-४३ सोबत दाखल केलेला खाते उतारा हा संगणकावर टाईप करुन दाखल केलेला आहे व तो बनावट आहे. त्यांनी पुढे त्यांच्या शपथपत्रात नमुद केले आहे की, निशाणी-४६ खाते उताऱ्यातील नोंदी प्रमाणे प्रतिवादी क्र.१ कडे रु.१,९६,९०५/- दि.०७/०६/२०१९ अखेर बाकी दर्शवली आणि या तारखेस संस्थेकडे त्यांच्या शेअर्सची रक्कम रु.२,००,०००/- जमा होती आणि ही शेअर्स रक्कम तत्कालीन व्यवस्थापक यांनी कर्ज खात्यामध्ये वर्ग करुन कर्ज खाते निल केले. परंतु याठिकाणी ही स्पष्ट करणे आवश्यक आहे की, वादीच्या उलटतपासणीमध्ये ही बाब आली आहे की, आजही प्रतिवादी क्र.१ ची शेअर्सची रक्कम रु.२ लाख संस्थेकडे जमा आहे. त्यामुळे ती रक्कम व्यवस्थापकांनी कर्ज खात्यामध्ये वर्ग केली या प्रतिवादी क्र.१ च्या तोंडी पुराव्यामध्ये तथ्यता नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये मान्य केले आहे की, ऑक्टोबंर-२०१८ मध्ये रक्कम रु.२,२५,०००/- त्यांनी संस्थेत भरले. तसेच डिसेंबर-२०१८ ते एप्रिल-२०१९ पर्यंत त्यांच्या पगारातुन रु.१,०००/-, ५००/- जमा झाले आणि या रक्कमेशिवाय त्यांनी इतर रक्कम भरल्या नाहीत हे सुध्दा मान्य केले. प्रामुख्याने त्यांनी उलटतपासणीमध्ये मान्य केले आहे की, एप्रिल-२०१९ पर्यत कर्ज निल झाले नव्हते. वादीचे वकील श्री.कवडे यांनी प्रतिवादी क्र.१ च्या उलटतपासणीमध्ये ही बाब रेकॉर्डवर आणली आहे की, प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेल्या खाते उताऱ्यानुसार दि.३१/३/२०१९ अखेर रु.४,६२,०००/- बाकी होते. निशाणी-४६ खाते उताऱ्यामधील नोंदीचे अवलोकन केले असता दि.३१/३/२०१९ अखेर प्रतिवादी क्र.१ कडे रु.४,६२,०००/- बाकी होते. परंतु मार्च-२०१९ मध्ये रक्कम पुर्ण भरली हे दाखविण्याकरिता कोणतेही दस्त दाखल केले नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये हेसुध्दा मान्य केले आहे की, दावा दाखल करेपर्यंत

त्यांनी रक्कम भरली नाही. परंतु मे-२०१९ मध्ये शेअर्स रक्कम वजा जाता रु.२,६६,०००/- भरल्याचे त्यांनी कबुल केले.

१४) वादी यांनी निशाणी-३६ आणि निशाणी-४३ कडे दाखल केलेल्या खाते उताऱ्यावरुन प्रतिवादी क्र.१ कडे दाव्यातील मागणी रक्कम रुपये बाकी आहे किंवा नाही हेसुध्दा पहाणे आवश्यक आहे. निशाणी-३६ आणि निशाणी-४३ खाते उताऱ्याप्रमाणे डिसेंबर-२०२१ अखेर रु.३,५९,८४९/- बाकी असल्याचे दर्शवले आणि याच आधारे वादी संस्थेने रक्कमेची मागणी केली. परंतु प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी-४६ कडे दाखल केलेल्या वादी संस्थेच्या खाते उताऱ्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. सदर निशाणी-४६ कडील खाते उताऱ्यातील नोंदी या संस्थेनेच घेतल्या आहेत आणि यामधील नोंदी चूकीच्या आहेत हे प्रतिवादीने नाकारले नाही. उलट या खाते उताऱ्याप्रमाणे दि.३१/३/२०१९ अखेर प्रतिवादी क्र.१ कडे रु.४,६२,०००/- बाकी असल्याचे रेकॉर्डवर आले आहे. परंतु वादीने दाखल केलेल्या निशाणी-४३ आणि निशाणी-३६ खाते उताऱ्यामध्ये दि.३१/३/२०१९ अखेर रु.५,२८,०४७/- बाकी दाखवले. वादीच्या कथनाप्रमाणे निशाणी-३६ मध्ये पीओसीट सॉप्टवेअर सोल्युशन प्रमाणे खाते उतारा वापरुन व्यवहार ठेवले. परंतु हे सॉप्टवेअर व्यवस्थीत काम करित नसल्याने वादी संस्थेने त्यामध्ये असलेल्या तृटी दुरुस्ती करण्याबाबत संबंधीत कंपनीकडे पत्रव्यवहार केला. परंतु त्यांनी दुरुस्ती करुन दिली नाही आणि याकरिता वादीने निशाणी-२४ सोबत संबंधीत कंपनीकडे केलेला पत्रव्यवहाराच्या प्रती दाखल केल्या. त्यामुळे निशाणी-४६ मध्ये कर्ज, व्याज दाखविण्यात आले नाही. सदरचे पत्रव्यवहार हे सन २०२० मधील असुन वादीने दाखल केलेल्या खाते उताऱ्यामध्ये सन २०२१ नंतर योग्य त्या कर्ज, व्याजाच्या नोंदी दाखवल्या आहेत. निशाणी-४६ प्रतिवादीने दाखल केलेल्या खाते उताऱ्यामध्ये खाली संबंधीत सॉप्टवेअरचे नाव नमुद असुन ह्या खाते उताऱ्यामध्ये भरलेल्या रक्कमेच्या नोंदी ह्या तारखेप्रमाणे घेतल्या आहेत. परंतु वादीने दाखल केलेल्या निशाणी-३६ आणि ४३ खाते उताऱ्याचे अवलोकन केले असता दिसुन येते की, यामधील नोंदी ह्या संस्थेने मुळ बुकामधील नोंदीवरुन घेतल्याचे स्पष्ट होत आहे आणि तसे प्रमाणपत्र या खाते उताऱ्याच्या खाली कार्यकारी संचालकांच्या सहीचे आहे. यावरुन हे स्पष्ट होत आहे की, ह्या खाते उताऱ्यातील नोंदी ह्या टाईप केलेल नोंदी आहेत आणि निशाणी-४६ प्रतिवादीने दाखल केलेल्या नोंदी ह्या संबंधीत सॉप्टवेअरनुसार असल्याचे दिसुन येते. हा खाते उतारा वादी संस्थेचा असल्याचे साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले.

संस्थेच्या म्हणण्याप्रमाणे निशाणी-४६ खाते उतारा सॉप्टवेअरचे काम चालू असल्यामुळे अधिकृत नाही. परंतु साक्षीदाराने स्पष्टपणे उलटतपासात मान्य केले की, आजही सॉप्टवेअरचा नियमितपणे वापर चालू आहे.

१५) निशाणी-४६ खाते उतारा संस्थेने नाकारला नाही परंतु तो खोटा असल्याचे संस्थेने कथन केले. परंतु त्यामधील नोंदी चूकीच्या आहेत हे संस्थेने सिध्द केले नाही. तो खाते उतारा वादी आणि प्रतिवादीने दाखल केलेल्या खाते उताऱ्याच्या रक्कमेच्या नोंदी सारख्याच असुन निशाणी-३६ खाते उताऱ्यानुसार प्रतिवादीकडे दि.२९/५/२०१९ अखेर रु.१,९६,०००/- बाकी होते. परंतु संस्थेने निशाणी-३६ आणि ४३ खाते उताऱ्यामध्ये मे-२०१९ अखेर रक्कम रु.२,६४,१४४/- दाखवली. निशाणी-४६ खाते उताऱ्यामधील नोंदी सॉप्टवेअरनुसार असल्यामुळे माझ्यामते प्रतिवादी क्र.१ कडे माहे मे-२०१९ अखेर दाखवलेली बाकी रक्कम रु.१,९६,०००/- योग्य आहे. मुद्दा निर्माण होतो की, प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे माहे मे-२०१९ अखेर रु.१,९६,०००/- बाकी होते आणि प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी सभासदत्वाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांचे संस्थेकडे असलेले रु. २.०० लाख शेअर्स रक्कम वजा जाता प्रतिवादीचे कर्ज निल झाले. प्रथमतः प्रतिवादीने ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, त्यांनी संस्थेकडे लेखी स्वरुपात सभासदत्वाचा राजीनामा दिला होता आणि तो राजीनामा संस्थेने स्विकारल्याचे प्रतिवादीला कळविले आणि त्यामुळे त्यांचे सभासदत्व संपुष्टात येऊन शेअर्स रक्कम रु.२.०० लाख कर्ज खात्यामध्ये वर्ग केली. प्रतिवादी क्र.१ यांनी वर नमुद केल्याप्रमाणे त्यांचे सभासदत्वाचा राजीनामा स्विकारल्याबाबत कोणतेही कागदपत्रे दाखल केली नाहीत किंवा त्यांनी लेखी स्वरुपात संस्थेकडे राजीनामा दिला याचीसुध्दा प्रत दाव्यात दाखल नाही. म.स.सं. अधिनियम कलम २५ अन्वये सभासदाने त्यांचे सभासदत्वाचा राजीनामा दिला आणि तो संस्थेने स्विकारल्यास सभासदत्व संपुष्टात येते. परंतु या ठिकाणी प्रतिवादी क्र.१ यांचा राजीनामा स्विकारल्याचे कागदपत्रे नाहीत आणि यासंबंधी वादी साक्षीदाराच्या उलटतपासणीमध्ये कोणतीही बाब रेकॉर्डवर आली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे राजीनामा दिला परंतु त्यांचा राजीनामा संस्थेने स्विकारला किंवा नाही याची चौकशी प्रतिवादी क्र.१ यांनी संस्थेकडे केली असल्याचा पुरावा नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचा राजीनामा मंजूर झाल्याचे संस्थेचे क्लर्क राजीव बन्सवार यांनी सांगितल्याचे उलटतपासात मान्य केले. परंतु प्रतिवादी क्र.१ चा राजीनामा संस्थेच्या कोणत्या सभेमध्ये आणि कोणत्या ठरावान्वये

मंजूर केला याबाबत लेखी पुरावा नाही. म.स.सं. अधिनियम १९६० नियम क्र.२१ (२) मधील तरतुदीनुसार *"एखाद्या सदस्याने तो संस्थेला देणे असलेल्या कोणत्याही रक्कमा पूर्ण दिल्या नसतील आणि तसेच दुसऱ्या एखाद्या सदस्याचा जामीन म्हणून किंवा अन्य प्रकारे जबाबदार असेल तर त्याने अशा जबाबदारीतुन स्वतःची मुक्तता केली नसेल तर अशा सदस्याचा राजीनामा संस्था स्विकारणार नाही. "* या तरतुदीवरुन हे स्पष्ट होत आहे की. जोपर्यंत एखाद्या सभासदाकडे संस्थेची रक्कम परतफेड करत नाही, तोपर्यंत संस्थेला राजीनामा स्विकारता येत नाही. याठिकाणी प्रतिवादी क्र.१ यांनी राजीनामा दिल्याचे कथन केले परंतु त्यांच्याकडे मे-२०१९ अखेर रु.१,९६,०००/- बाकी होते आणि ही रक्कम परतफेड केल्याशिवाय संस्थेला प्रतिवादी क्र.१ चा राजीनामा वरील तरतुदीनुसार स्विकारता येण योग्य नव्हते. प्रतिवादी क्र.१ यांनी संस्थेकडे म.स.सं. अधिनियम १९६० चे नियम २१ नुसार नमुद छापिल नमुन्याप्रमाणे राजीनामा देणे आवश्यक होते. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे शेअर्सची रक्कम रु.२.०० लाख वजा जाता त्यांच्याकडे कोणतीही रक्कम बाकी राहात नाही. परंतु त्यासाठी प्रतिवादी क्र.१ यांनी लेखी स्वरुपात संस्थेकडे अर्ज देणे आवश्यक होते. केवळ राजीनामा दिला आणि शेअर्सची रक्कम संस्थेकडे बाकी होती त्यामुळे आपोआप कर्ज निल झाले असे म्हणता येणार नाही. प्रतिवादी क्र.१ चा राजीनामा जोपर्यंत संस्था ठरावाद्वारे मंजूर करत नाही तोपर्यंत शेअर्सची रक्कम कर्ज खाती किंवा सभासदला परत मागण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

१६) वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ कडे रक्कम रु.१,९६,०००/- मे-२०१९ अखेर बाकी होते. त्यामुळे या खाते उताऱ्यानुसार वादी संस्था जून-२०१९ पासुन रक्कम रु.१,९६,०००/- वर द.सा.द.शे. १२% आणि २% दंडव्याजाप्रमाणे रक्कम वसुल करण्यास हक्कदार आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या कैफियतमध्ये कथन केले आहे की, त्यांनी संस्थेकडे आजपर्यंत रु.४०,०००/- रक्कम भरली. वादी संस्थेने दाखल केलेले खाते उतारासुध्दा दर्शवितात की, प्रतिवादी क्र.१ यांनी संस्थेकडे रु.४०,०००/- पेक्षा जास्त रक्कम भरली. तसेच याशिवाय संस्थेने लाभांश रक्कमसुध्दा प्रतिवादीच्या खात्यामध्ये वर्ग केल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र.१ यांनी मे-२०१९ नंतर भरलेल्या रक्कमेचा समावेश मे-२०१९ नंतर व्याज रक्कमेसहीत येणाऱ्या रक्कमेत ह्या रक्कमेचा समावेश होणे आवश्यक आहे.

१७) वादी संस्थेने दाव्यात रु.३,५९,८४९/- रक्कमेची मागणी द.सा.द.शे. १२% व्याज अधिक दंडव्याज २% ची मागणी केली आहे. परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणे वादी संस्था रक्कम रु.३,५९,८४९/- करीता हक्कदार नाही. कर्ज कागदपत्रे दर्शवितात की, प्रतिवादी क्र.१ यांनी द.सा.द.शे. १२% व्याज देण्याचे मान्य केले आहे. निशाणी-३४ हमीपत्रामध्ये दंडव्याजाचा उल्लेख आहे. त्यामुळे वादी संस्थेला द.सा.द.शे. १४% दंडव्याजासह रक्कम वसुल करण्याचा अधिकार आहे.

१८) **<u>मुद्दा क्र.२ करिता</u> :-** प्रतिवादीने कैफियतमध्ये नमुद केले आहे की, वादीचा दावा मुदतीत नाही. परंतु दावा मुदतबाह्य का आहे याचा सविस्तर खुलासा केला नाही. वादीचा दावा मुदतबाह्य आहे किंवा नाही याकरिता कलम ९२ (१) (अ) मधील तरतुदीचे निरिक्षण करणे आवश्यक आहे. या कलमातील तरतुदीनुसार अशाप्रकारचा दावा दाखल करण्याकरिता मुदत ही सभासद मयत झाल्यापासुन आणि सभासदाचे सभासदत्व रद्द झाल्यापासुन चालू होते. आणि कलम ९२ (१) (ब) नुसार या करिता ६ वर्षाचा दावा दाखल करण्याचा कालावधी नमुद आहे. प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द कर्ज वसुलीकरिता दाखल केला असुन वरील नमुद तरतुदीनुसार दाव्यामध्ये कोणतीही घटना घडली नाही. जोपर्यंत सभासदाचे सभासदत्व अस्तित्वात आहे तोपर्यंत संस्थेला सभासदाने कर्ज घेतल्यापासुन कधीही दावा दाखल करता येतो. याकरिता कोणत्याही प्रकारची मुदत अथवा कालावधी नाही. वादीचा दावा मुदतीत असल्यामुळे प्रतिवादीने केलेले कथन अमान्य करण्यात येत आहे.

वरील कारणास्तव ही बाब सिध्द होत आहे की, वादीने त्यांचा दावा सिध्द केला आहे. करिता मी, खालील आदेश पारित करित आहे.

<u>आदेश</u>

१) वादीचा दावा अंशतः खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादींनी व्यक्तिगत व सामुहिकरित्या रु.१,९६,०००/- द.सा.द.शे. १४% दंडव्याजासह दि.०१/०१/२०२२ पासुन ते पूर्ण कर्ज रक्कम वसुल होई पर्यंत वादीला द्यावे.

३) प्रतिवादी क्र.१ यांनी संस्थेकडे माहे मे-२०१९ नंतर रक्कम रु.४०,०००/- भरलेली रक्कम प्रतिवादींकडे बाकी असलेल्या रक्कमेत समावेश करावा व बाकी रक्कम प्रतिवादींकडून वसुल करण्यात यावी.

४) प्रतिवादींनी व्यक्तिगत व सामुहिकरित्या वादी संस्थेला नोटीस खर्च म्हणून रक्कम रु.२,०००/- द्यावी.

५) आदेशानुसार हुकूमनामा काढण्यात यावा.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : २३/११/२०२३

(बी.एस.लखोटे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.

मे.न्यायाधीश सहकार न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.
(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)

दावा क्रमांक ५१/२०२२

वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्या.,
शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर
शाखा- अंबर प्लाझा, गाळा नं.५६/५७,
पहिला मजला, स्टेशन रोड, अहमदनगर
(श्री. अरुण रावसाहेब इंगळे यांचे मार्फेत.) **---- वादी**

विरुध्द

१) श्री. प्रविण दिलीप खांदवे
रा. घर नं. ३९, मोहीनी नगर, दत्त मंदिराजवळ,
केडगांव देवी, अहमदनगर.

२) श्री. सुदेश श्रीधर दुगम
म.रा.वि.वि.कं.लि.ई.एच.व्ही.४०० केव्ही.,
निर्मळ पिंपरी,मु. पो. बाभळेश्वर,
ता. राहाता, जि. अहमदनगर.

३) श्री. विजय नवनाथ थोरे
म.रा.वि.वि.कं.लि.ई.एच.व्ही.४०० केव्ही.,
निर्मळ पिंपरी,मु. पो. बाभळेश्वर,
ता. राहाता, जि. अहमदनगर.

४) पिराजी गंगाधर धनवटे (मयत)
वारस श्रीमती आशा पिराजी धनवटे
मु.पो. बाभळेश्वर, ता.राहाता, जि. अहमदनगर.

---- प्रतिवादी

नि वा डा

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ९१ अन्वये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वरील दाव्याचे कारण झाल्यावरुन मी वरील पक्षकारांना समन्स बजावून दाव्याची योग्य ती कायदेशीर चौकशी करुन व माझे पुढे आलेल्या पुराव्या वरुन दिलेल्या न्यायनिर्णय निकालपत्रास अनुसरुन खालीलप्रमाणे निवाडा देत आहे.

.२.

१) वादीचा दावा अंशतः खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादींनी व्यक्तिगत व सामुहिकरित्या रु.१,९६,०००/- द.सा.द.शे. १४% दंडव्याजासह दि.०१/०१/२०२२ पासुन ते पूर्ण कर्ज रक्कम वसुल होई पर्यंत वादीला द्यावे.

३) प्रतिवादी क्र.१ यांनी संस्थेकडे माहे मे-२०१९ नंतर रक्कम रु.४०,०००/- भरलेली रक्कम प्रतिवादींकडे बाकी असलेल्या रक्कमेत समावेश करावा व बाकी रक्कम प्रतिवादींकडून वसुल करण्यात यावी.

४) प्रतिवादींनी व्यक्तिगत व सामुहिकरित्या वादी संस्थेला नोटीस खर्च म्हणून रक्कम रु.२,०००/- द्यावी.

५) कोर्ट फी स्टँम्प खर्च रक्कम रु.४,६२०/-

सदरचा निवाडा या न्यायालयाच्या सही शिक्यानिशी दिला असे.

स्थळ : अहमदनगर.
दिनांक : २३/११/२०२३

(बी. एस. लखोटे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.